# दिल्ली सल्तनत काळातील हिंदू समाजातील स्त्रियांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन

**कु. ज्योती पुंडलिक बोबाटे** संशोधक विद्यार्थी नेवजाबाई हितकारीनी महाविद्यालय ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर (सहा. प्राध्यापक), इतिहास विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, आष्टी, जिल्हा- गडचिरोली, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**प्रा. डॉ. दशरथ धर्माजी आदे.** इतिहास विभाग प्रमुख, श्री गोविंदराव कला व विज्ञान महाविद्यालय, कुरखेडा, जिल्हा – गडचिरोली.

**डॉ. मोहन राजाराम कापगते** इतिहास विभाग प्रमुख, नेवजाबाई हितकारीनी महाविद्यालय ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर

---

सारांश :-

आदीम काळात स्त्रियांचा असलेला उच्च प्रतीचा दर्जा उत्तर वैदिक काळात खालावण्यास सुरुवात झाली. बौद्ध व जैन काळात स्त्रियांना अधिकार मिळवून देण्याचे प्रयत्न करण्यात आले. परंतु गुप्त कालखंडात स्त्रियांच्या दर्जात अजून घसरण झाली. त्यानंतर अकराव्या शतकामध्ये परकीय मुस्लिम आक्रमकामुळे भारतीय सनातनी समाजाने स्त्रियांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून स्त्रियांवर अनेक कठीण बंधने लादली. दिल्ली सल्तनत काळात हिंदू स्त्री पूर्णपणे परावलंबी कौटुंबिक सामाजिक व आर्थिक दृष्ट्या पूर्णपणे पुरुषावर अवलंबून असलेली बनली. या कालखंडामध्ये समाज व्यवस्थेत अनेक दोष निर्माण झाल्यामुळे भारतीय हिंदू स्त्री ही गुलामगिरीत अडकल्या गेली.

बीज संज्ञा :-

सामाजिक दर्जा खालावला. बाल विवाह, जोहर व पडदा प्रथा, हिंदू - स्त्री, दिल्ली सल्तनत काळ.

प्रस्तावना:-

आदिम काळात भारतात मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात होती. स्त्रीयांचा सामाजिक दर्जा उच्च प्रतीचा होता. स्त्री ही कुटुंबातील प्रमुख हालचालीचे केंद्रस्थान मानले जाई. त्यामुळे कुटुंबात स्त्रीचे स्थान मानाचे व अधिकाराचे होते. स्त्रियांना अनेक बाबतीत स्वातंत्र्य होते. वेदकाळ , रामायण, महाभारत काळात धर्मपत्नीला गृहलक्ष्मी मानण्यात येई. समाज जीवनात स्त्रियांचे स्थान आदर्श स्वरूपाचे होते. पूर्व वैदिक काळात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार होता. धार्मिक कार्यात सुद्धा स्त्रियांना भाग घेण्याचा अधिकार होता. स्त्री मुक्तपणे समाजातील धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात सहभागी होत होती. समाजात पडदा पद्धती प्रचलित नव्हती. परंतु उत्तर वैदिक काळात स्त्रियांच्या दर्जा व स्थितीमध्ये परिवर्तन होण्यास सुरुवात झाली. त्यांचा शिक्षणाचा अधिकार काढून घेण्यात आला. त्यांना असलेले धार्मिक अधिकार सुद्धा काढून टाकण्यात आले. उत्तर वेदिक काळात भारतीय स्त्रियांचा दर्जा हा हीन अवस्थेत पोहोचला. सहाव्या शतकात बौद्ध व जैन धर्माच्या स्थापनेनंतर स्त्रियांचे हरवलेले अधिकार मिळवून देण्याचा व त्यांच्या दर्जा व स्थानामध्ये सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न करण्यात आले. पुन्हा गुप्त कालखंडामध्ये स्त्रियांचा सामाजिक दर्जा अजून जास्ती खालावला. स्त्रियांवर अनेक बंधने आली. अकराव्या शतकात तुर्क मुस्लिम आक्रमकानी भारतावर आक्रमण सुरू केले. आणि स्त्रियांचा दर्जा अतिशय खालावला. मुस्लिम संस्कृतीचा भारतीय समाज जीवनावर प्रभाव पडल्याने त्याचे परिणाम तात्कालीन हिंदू स्त्री जीवनावर सुद्धा पडलेले दिसून येते. स्त्री स्वातंत्र्य, हक्क इत्यादी बाबतीत पूर्वीच्या सनातनी हिंदू समाजाची प्रवृत्ती धार्मिक दृष्ट्या अधिक सनातनी बनली. परिणामी समाजातील स्त्रियांचे स्थान व दर्जा अधिकच खालावला. मुस्लिम आक्रमणामुळे स्त्रिया अनेक रूढी, परंपरांच्या बंधनात जखडल्या गेल्या. व स्त्रियांच्या अंधकारमय युगाला सुरुवात झाली. इंग्रजी राजवटीत अनेक थोर समाज सुधारकांनी स्त्रियांच्या मुक्तीसाठी प्रयत्न केले. आजच्या आधुनिक काळात स्त्रियांनी सर्वच क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटवला. तरी सुद्धा आजही पुरुषी अहंकारातून स्त्री पुरुष समानता नाकारण्यात येते.

दिल्ली सल्तनत काळातील हिंदू समाजातील स्त्रियांची स्थिती :-

समाजाची प्रगती तोपर्यंत पूर्ण होत नाही, जोपर्यंत त्या समाजातील स्त्रियांना आदर मिळत नाही. भारतीय समाजात काळानुसार स्त्रियांच्या सामाजिक दर्जा व स्थानामध्ये परिवर्तन होत आलेले आहे. स्त्रियांच्या स्थितीत प्राचीन काळापासून सल्तनतपूर्व काळापर्यंत अनेक चढ-उतार आलेले आहेत व त्यानुसार त्यांच्या अधिकारात परिवर्तन झाले. पूर्व वैदिक काळात स्त्रियांची स्थिती अतिशय प्रगतीशील व सन्माननिय होती. उत्तर वैदिक काळात स्त्रियांच्या स्थितीत परिवर्तनास सुरुवात झाली. सलतनतपूर्व काळात स्त्रियांचा सामाजिक दर्जा खालावण्यास सुरुवात झाली. कोणत्याही समाजाचा सामाजिक स्तर त्या काळातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा पाहून समजला जाऊ शकतो. हिंदू कायदा भारतीय

स्त्रियांना आदराच्या दृष्टिकोनातून पाहतो. एका ठिकाणी मनू याने लिहिले आहे 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमते तत्र देवता' म्हणजे ज्या ठिकाणी स्त्रियांना सन्मानाच्या दृष्टीने पाहिल्या जाते त्या ठिकाणी देवता निवास करते. स्त्री व पुरुष हे दोन्ही प्रकृतीची रचना आहे. दोघांचेही महत्व अगदी बरोबर आहे. परंतु स्त्रीयांसाठी काही मर्यादा निश्चित केलेल्या आहेत. त्यामुळे स्त्रियांना नेहमी पुरुषापेक्षा कमी दर्जा दिला जात असे. स्त्रीला जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर एखाद्या पुरुषावर आश्रित रहावे लागले आहे. बालपणी वडिलावर, तरुण वयात पतीवर, विधवा झाल्यावर आपल्या मुलावर तिला आश्रित रहावे लागते. मुलीच्या जन्माला दुःखाचे कारण व पुत्राच्या जन्माला आनंदाचे कारण समजल्या जात होते.

जन्मापासून मृत्यूपर्यंतचे परिवारातील सर्व संस्कार, धार्मिक विधी, स्त्री शिवाय पूर्ण होऊ शकत नव्हते. त्यामुळे समाजात तिचे स्थान महत्त्वपूर्ण होते. हिंदू समाजात स्त्रियांचे स्थान महत्त्वपूर्ण असून त्यांची आर्थिक स्थिती परावलंबी होती. उच्च वर्गातील स्त्रियांची स्थिती चांगली होती. त्यांना नेहमी देखरेखीखाली ठेवल्या जात होते. त्यांच्या खाण्यापिण्याची, राहण्याची उत्तम व्यवस्था केली जात होती. उच्च वर्गात यांना पद, प्रतिष्ठा व त्यांच्या स्तरानुसार मानसन्मान दिला जात होता. स्त्री ही आई, बहिण व मुलीच्या रूपात सन्माननीय होती. उच्च वर्गातील स्त्रिया श्रीमंत परिवारातील असल्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा स्तर चांगला होता. त्यांना त्यांच्या खर्चासाठी मुबलक प्रमाणात पैसा उपलब्ध होत होता. वेगवेगळ्या सण समारंभाच्या वेळेस या स्त्रिया दान करत होत्या.. उच्च वर्गातील स्त्रियांच्या शिक्षणाची व्यवस्था केली होती. शिक्षक त्यांना घरीच येऊन शिक्षण देत होते. उच्च वर्गातील स्त्रियांना पडदा प्रथेचे पालन करावे लागत होते. सार्वजनिक कार्यक्रमात त्यांच्या बैठकीची वेगळी व्यवस्था केली जात होती. याशिवाय घराच्या बाहेर जाण्यासाठी त्यांना पालखीची व्यवस्था केली जात होती. मध्यम वर्गातील स्त्रियांना उच्च वर्गातील स्त्रियांपेक्षा थोडी जास्त स्वतंत्रता होती. तरीही पडदा प्रथा असल्याने स्वतंत्रपणे त्यांना घराच्या बाहेर ये – जा करण्याची परवानगी नव्हती. घराच्या बाहेर पडदा घेऊनच जावे लागत होते.

मध्यम वर्गातील स्त्रिया घरगुती काम, मुलांचे पालन - पोषण, नवऱ्याची सेवा करणे, आपले कर्तव्य समजत असत. आपल्या परिवाराशिवाय बाहेरील समाजात काय होत आहे याविषयी तिला कोणतेही कर्तव्य नव्हते. या वर्गातील स्त्रियांना लहानपणापासूनच योग्य गृहिणी बनण्याचे शिक्षण दिल्या जात होते. त्यांच्या शिक्षणाकडे फार कमी लक्ष दिल्या जात होते. घरीच शिक्षणासोबत विणकाम, कशिदा करणे, शिवणकाम, स्वयंपाक बनविणे इत्यादी शिक्षा घेत होती. अधिकचे शिक्षण देण्याची पद्धत नव्हती. कनिष्ठ वर्गातील स्त्रियांमध्ये पडदा प्रथेची परंपरा नव्हती. खालच्या वर्गातील स्त्रिया अमीर, उमराव व शासकाकडे घरकाम करण्यासाठी जात होत्या. त्यांना प्रत्येक महिन्याला पगार दिल्या जात होता. उत्सव व सणाला त्यांना भेटवस्तू, कपडे, जेवण दिल्या जात होते. कनिष्ठ वर्गातील स्त्रियांना दासी बनविल्या जात होते. त्यांचे आयुष्य आश्रिता सारखे होते. हिंदू समाजातील या वर्गातील स्त्रिया परिवारातील पुरुषांना त्यांच्या व्यावसायिक कामात मदत करीत होत्या. तसेच घरखर्च चालवण्यासाठी स्त्रिया पुरुषांना मदत करीत होत्या. हा वर्ग श्रम करणारा वर्ग होता. या वर्गात गरिबी जास्त होती. या वर्गातील स्त्रिया अत्यंत कष्ट करणाऱ्या होत्या. या वर्गात जोहर प्रथा, सती प्रथा इत्यादी नव्हत्या. परंतु बालविवाहाची प्रथा होती. शिक्षणापासून या स्त्रिया फार लांब होत्या. आर्थिक स्वरूपात स्त्रियांना महत्त्व होते. त्या स्त्रिया पुनर्विवाह करू शकत होत्या. याशिवाय कनिष्ठ वर्गातील स्त्रियामध्ये पडदा प्रथा नव्हती, आईच्या रूपात स्त्रीला सन्मान होता. या काळात स्त्रिया असुरक्षित होत्या. कारण, शासक व अमीर उमराव लोक सुंदर स्त्रिया प्राप्त करण्याच्या प्रयत्नात असत. त्यांच्यासाठी युद्धहि केल्या जात होते. विजय प्राप्त केल्यावर संपत्ती सोबत स्त्रियांवर अधिकार प्राप्त केल्या जात होता. त्यामुळे हिंदू लोक आपल्या मुलींना अन्यायापासून वाचविण्यासाठी त्यांचे बाल विवाह करीत होते. सामान्यता एक विवाह करण्याची प्रथा होती. दुसरा विवाह करण्याची परवानगी पत्नीचा मृत्यू झाल्यास किंवा तिला मुले होत नसतील तर दिल्या जात होती. श्रीमंत लोक एकापेक्षा जास्त स्त्रियांशी विवाह करीत होते. 'निकोलो कोटी' यांच्या मतानुसार एक विवाह करण्याची पद्धत होती. परंतु बहुविवाह सुद्धा होत होते. हिंदूधर्मात जातीच्या बाहेर विवाह करण्यात मनाई होती. याकाळात हुंडा पद्धती प्रचलित होती. जी समाजातील सर्व वर्गासाठी होती. हुंडा अधिक द्यावा लागत असल्यामुळे, लोक आपल्या मुलींचा विवाह, वय जास्त असलेल्या पुरुषासोबत करीत होते. हिंदू धर्मानुसार एखादी स्त्री विधवा झाल्यास तिला दुसरा विवाह करण्याची परवानगी नव्हती. फक्त कनिष्ठ जातीमधील स्त्रियांना दुसरा विवाह करण्याची परवानगी होती. विधवा स्त्रीला आपल्या नवऱ्यासोबत सती जावे लागत होते. मृत्यूपर्यंत संन्यासी जीवन जगावे लागत होते.

जास्तीत जास्त प्रमाणात स्त्रिया सती जात होत्या. विधवा स्त्रियांसोबत फार वाईट व्यवहार केला जात होता. समाजात त्यांच्याकडे वाईट दृष्टीने पाहिल्या जात होते. त्यांना अतिशय दुःखी जीवन जगावे लागत होते. त्यांना शुभ कार्यात भाग घेण्यास परवानगी नव्हती. रंगीत कपडे घालण्यास परवानगी नव्हती. शृंगार करणे, लांब केस ठेवणे, यांची

परवानगी नव्हती. त्यांना सार्वजनिक विहिरीवरून पाणी भरण्याचीही सुद्धा परवानगी नव्हती. दिल्ली सल्तनत काळात हिंदू समाजात अनेक वाईट प्रथा अस्तित्वात होत्या. उदा. वेश्यावृत्ति, जोहर प्रथा, देवदासी प्रथा, बळी प्रथा इत्यादी. विदेशी आक्रमणामुळे अनेक हिंदू परिवार उद्ध्वस्त झाले. परिवारातील ज्या स्त्रिया एकट्या राहिल्या त्यांना संरक्षण देणारे कोणीही उरले नाही. त्या स्त्रियांना आपल्या उदरनिर्वाहासाठी वेश्या व्यवसायाला स्वीकारावे लागले. वेश्या व्यवसाय समाजासाठी शाप होता. वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचा व्यवहार हा सुसंस्कृत होता. काही लोक त्यांच्यापासून प्रभावी सुद्धा होत होते. दिल्ली सल्तनत काळात जोहर प्रथा अस्तित्वात होती. जोहर प्रथेचे पालन उच्च वर्गातील स्त्रिया व राजांच्या राण्या करीत होत्या. युद्धामध्ये पतीच्या निधनानंतर त्यांना विजय मिळालेल्या राजासोबत रहाणे अत्यंत अपमानजनक होते. त्यामुळे आपल्या मानसन्मानासाठी या स्त्रिया जोहर करीत होत्या. तैमुरने भारतातील 'वरणेर' नावाच्या ठिकाणी आक्रमण केले. अनेक लोकांची हत्या केली. तेव्हा तैमुरलंगापासून वाचण्यासाठी अनेक हिंदू परिवारातील स्त्रियांनी तिचे पालन केले**.** दिल्ली सल्तनत काळातील स्त्रियांना गुलाम बनविण्याची पद्धत होती. युद्धात हरलेल्या शासकांच्या स्त्रियांना दासी बनवून दुसऱ्या राजाला भेट देत होते. त्यांना दरबारात नृत्य करून मनोरंजन करावे लागत होते. उच्च वर्गातील स्त्रियांना हे अपमान जनक होते. हिंदू धर्मात देवदासी प्रथा अस्तित्वात होती. अनेक लोक आपल्या मुलींना लहानपणापासूनच मंदिरात पूजा-अर्चा व गायनासाठी देवदासी भेट देत होते. त्यांना देवदासीच्या रुपात मंदिरात ठेवल्या जात होते. देवदासींना मंदिरात धार्मिक कार्य करावे लागत होते. अनेक लोक त्यांच्याकडून अनैतिक कार्य करून घेत होते.

भारतात प्राचीन काळात स्त्री ही पुरुषांच्या सर्व कार्यात सहभागी व्हायची असे अल्बरेणू म्हणतो. भारतात पडदा प्रथेची परंपरा नव्हती. राज्यांच्या स्त्रिया कोणताही पडदा न ठेवता राजदरबारात येत होत्या. हुयनस्वांग लिहितो की, हर्षवर्धनाची आई राजदरबारातील लोकांच्या भेटी घेत होती. बगीचा व मंदिरात पुरुषांसोबत स्त्रियांच्या जाण्याचा उल्लेख 'कामसूत्र' सारख्या ग्रंथांमध्ये सापडतो. स्त्रिया ह्या अस्त्र - शस्त्र चालवण्यात निपून होत्या. युद्धाच्या वेळेस राजांच्या राण्या व अन्य स्त्रियांच्या सहभागाचा उल्लेख आढळतो. यावरून आपणास समजते की, पूर्वी पडदा प्रथेची पद्धत नव्हती. मुसलमानांच्या भारतातील प्रवेशा सोबतच पडदा प्रथा भारतात आली. उत्तर भारतात मुसलमानांची शक्ती वाढल्यामुळे उच्च कुळामध्ये पडदा प्रथा सुरु झाली. सल्तनत काळातील इतिहासकार कर्नल टाड यांनी राजस्थानी स्त्रियांच्या दुःखदायक जीवनाचे वर्णन त्यांचा ग्रंथ **हिस्टरी ऑफ राजस्थान** या ग्रंथात केले आहे. एस. एम. जाफर या लेखकाने पडदा करणे हिंदू स्त्रियांचे धार्मिक कर्तव्य आहे असे म्हटले आहे. आणि त्याच्या समर्थनार्थ त्यांनी रामायण आणि महाभारतातील सीता आणि द्रोपतीचे उदा. दिले. धार्मिक ग्रंथांचे उदा. देऊन त्यांनी हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला की, हिंदू समाजात पडदा न करणे निंदनीय मानले जाते. एस. एम. जफर म्हणतात, सार्वजनिक कार्यक्रमात महिलांना बसण्यासाठी वेगळी व्यवस्था होती. ती पडद्याने झाकलेली होती. अशा प्रकारे मुस्लिम सत्तेच्या भारतातील स्थापनेनंतर हिंदू समाजात पडदा प्रथा आली हे मान्य करीत नाही. जफर पडदा करणे हे समाजात केवळ अभिजाततेचे लक्षण मानले जात असे. हिंदू समाजातही स्त्रियांचे एकांत वास पडद्याने झाकलेले असायचे. पडद्याने चेहरा झाकणे आदर व सन्मानाची गोष्ट मानल्या जात होती. हिंदू समाजातील शेतकरी परिवारातील स्त्रिया कोणताही पडदा करीत नव्हत्या. केवळ वडीलधाऱ्या व्यक्तीच्या समोर येताना त्या डोक्यावर पदर घेत होत्या. सल्तनत काळात उच्चवर्णीय हिंदू मध्ये पडदा पद्धती मोठ्या प्रमाणात सुरू झाली. हिंदूंमध्ये ही पद्धत मोठ्या प्रमाणात मुस्लिमांकडून आली. आपल्या स्त्रियांच्या सत्तित्वाचे रक्षण करण्यासाठी पडदा पद्धतीचा स्वीकार केल्या गेला. इराण व ग्रीस या देशांमध्ये पडदा प्रथा प्रचलित होती. तुर्क आक्रमकानी ही प्रथा आपल्याबरोबर भारतात आणली. भारतात विशेषता उत्तर भारतात ही पडदा प्रथा मोठ्या प्रमाणात स्वीकारल्या गेली. हिंदू स्त्रियांना पळवून नेण्याच्या भीतीपोटी ही प्रथा रूढ झाली.

हिंदू समाजात उत्तर भारतात अतिशय क्रूर आणि वाईट अशी जोहर प्रथा प्रचलित होती. तुर्कांचे आक्रमण जसजसे वाढू लागले तशी जोहर ही प्रथा समाजात मोठ्या प्रमाणात सुरू झाली. गुलाम काळखंडात भारतात तुर्कसत्ता स्थापन झाल्यावर राजपूत स्त्रिया आपले पवित्रता कायम ठेवण्यासाठी जोहर प्रथेद्वारे स्वतःला अग्नीच्या स्वाधीन करीत होती. जोहर प्रथेची पाळेमुळे मुस्लिम आक्रमणामुळे हिंदू समाजात मोठ्या प्रमाणात रुजली. रजपुत स्त्रियांच्या प्रतिष्ठा व मानसनमानाचे प्रतीक जोहर या प्रथेला समजले जाऊ लागले. खिलजी व तुघलक कालखंडात अनेक हिंदू स्त्रियांनी जोहर केल्याची उदाहरणे सापडतात. जोहर प्रथा रजपूत शासकांमध्ये मोठ्या प्रमाणात होती. आपल्या शिलाचे रक्षण करण्यासाठी रजपूत स्त्रिया स्वतःला अग्नीच्या स्वाधीन करीत होत्या. आपल्या पतीला युद्धात अपयश आल्यास स्त्रिया जोहर करीत होत्या. सुलतान अल्लाउद्दीन खिलजीने रणथंभोरवर आक्रमण केल्यावर तेथील चव्हाण शासकाने आपल्या स्त्रियांना अग्नीच्या स्वाधीन केले. मेवाडची महाराणी देवी पद्मिनीचा जोहर इतिहासात प्रसिद्ध आहे. मोहम्मद बिन

तुघलकाच्या काळात कंपिल येथील राय वर आक्रमण झाले तेव्हा तेथील स्त्रियांनी जोहार केला. सती प्रथेप्रमाणेच हिंदू समाजात जोहर ही सुद्धा एक क्रूर प्रथा होती.

मूल्यमापन :-

तुर्क लोकांच्या भारतात येण्याच्या पूर्वीच स्त्रियांची स्थिती बदलण्यास सुरुवात झाली होती. अनेक कुप्रथा पुरुषप्रधान समाजाने लागू करून स्त्रियांना पूर्णता पुरुषांवर आश्रित बनविले होते. कालांतराने तुर्कांचे भयानक आक्रमणे, अंतर्गत व बाह्य असुरक्षिततेने जेव्हा संपूर्ण भारतीय समाजात असुरक्षित बनवले तेव्हा स्त्री ही अनेक प्रकारच्या सामाजिक बंधनात बांधल्या केली. या काळात पुरुषप्रधान संस्कृतीत तत्कालीन परिस्थितीमुळे त्यांच्या सुरक्षेवर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले. स्त्रियांना पुरुषावर आश्रित रहावे लागले. मुस्लिम आक्रमकांनी हिंदू मुलींना व स्त्रियांना आपल्या जनानखान्यात ओढून नेण्याचा सपाटा लावला. स्त्रियांच्या सामाजिक जीवनाला उतरती कळा आली. कित्येक घरांमधून पडदा प्रथा, जोहर प्रथा, बालविवाह इत्यादी कुप्रथा मोठ्या प्रमाणात वाढू लागल्या. या संपूर्ण गोष्टींचा परिणाम सल्तनत काळात हिंदू स्त्रियांच्या सामाजिक दर्जावर झाला. सल्तनत काळात भारतीय समाजात स्त्रियांची स्थिती खालावण्यास व हिंदू स्त्रियांच्या अंधकारमय युगाला सुरुवात झाल्याचे स्पष्ट होते.

संदर्भ :-

1. लाल, के. एस. 'ट्वाईलाईट ऑफ द सलतनत', मुंशीराम मनोहरलाल पब्लिशर मुंबई, संस्करण १९९५, पृष्ठ क्रमांक २६८, २९२.

2. अशरफ, के. एम. 'हिंदुस्तान के निवासीयोका जीवन और उनकी परिस्थितीया', प्रकाशक वैज्ञानिक तथा तकनीकी शब्दावली आयोग शिक्षा मंत्रालय (भारत सरकार), प्रथम संस्करण १९६९, पृष्ठ क्रमांक १७०. ते १९१.

3. राधेश्याम, 'सल्तनत कालीन सामाजिक तथा आर्थिक इतिहास', बोहरा पब्लिशर अंड डिस्ट्रीब्यूटर इलाहाबाद, प्रथम संस्करण १९०७, पृष्ठ क्रमांक २८, २९२.

4. शर्मा, एल. पी. 'भारत का इतिहास', लक्ष्मी नरेन अग्रवाल आगरा, पृष्ठ क्रमांक २४४, २६४.

5. शुक्ला, सावीत्री, 'संत साहित्य की सामाजिक तथा आर्थिक पृष्ठभूमी', लखनऊ विश्वविद्यालय हिंदी प्रकाशन हिंदी विभाग लखनऊ, संस्करण १९६३, पृष्ठ क्रमांक ४६, ५१.

6. चोपडा, पुरी व दास, 'भारत का सामाजिक सांस्कृतिक और आर्थिक इतिहास', लक्ष्मी पब्लिकेशन दिल्ली, संस्करण १९७४, पृष्ठ क्रमांक ३१, ते ४१

7. मिश्रा, के. एम. 'उत्तरी भारत का मुस्लिम समाज', राजस्थान हिंदी ग्रंथ अक्यादमी जयपुर, प्रथम संस्करण १९७४, पृष्ठ क्रमांक ५६.

8. जफर, एस. एम. (अनुवादक महंमद सादिक खान), 'सम कल्चरल अस्पेक्ट्स ऑफ मुस्लिम रुल इन इंडिया', पेशावर पब्लिशर, प्रथम संस्करण १९३९, पृष्ठ क्रमांक १९८, १९९.

9. ओझा, गौरीशंकर हरिश्चंद्र, 'मध्यकालीन भारतीय संस्कृती' (इ. स. ६०० ते १२००), हिंदुस्तान अकॅडमी संयुक्त प्रदेश प्रयाग (इलाहाबाद), प्रथम संस्करण १९२८, पृष्ठ क्रमांक ६६.

10. मिनहाजुद्दीन, सिराज, 'तबकात- ए –नासिरी', इंग्रजी अनुवाद, मेजर एच. जी. रेवरटी भाग दोन, प्रकाशक ग्लिबर्ट अँड रिव्हिंगटन १८८१, पृष्ठ क्रमांक ६३८ ६४३.

11. टाड, कर्नल, 'हिस्टरी ऑफ राजस्थान', भाग दोन, साहित्यकार प्रकाशन जयपुर, संस्करण २००८, पृष्ठ क्रमांक ७४४.